नगरपरिषद/नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेस मान्यता देण्याबाबत

**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**

क्रमांक रानिआ-/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का-६

नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०६/०२/२०२०.

## आ दे श

ज्याअर्थी, -

(i) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण करणे याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे, आणि

(ii) संविधानाच्या अनुच्छेद २४३ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ४१(१) नुसार नगरपरिषदांची मुदत संपण्यापूर्वी त्यांची निवडणूक घेणे बंधनकारक आहे, आणि

(iii) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० नुसार नगरपालिका क्षेत्राची प्रभागामध्ये विभागणी आणि स्त्रिया, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी प्रभाग राखून ठेवण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे आहेत.

(iv) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०-अ च्या पोटकलम २ अन्वये प्राप्त अधिकारानुसार आयोगाचे अधिकार आणि कर्तव्ये त्यांच्या अधिनस्त किंवा शासनाच्या उपजिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याकडे किंवा नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्याकडे प्रदान करता येतील अशी तरतूद आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, मी यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र असे आदेश देत आहे की,-

राज्य निवडणूक आयोगाचे नगरपालिका क्षेत्राची प्रभागामध्ये विभागणी आणि स्त्रिया, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी प्रभाग राखून ठेवण्याचे अधिकार प्रदान केल्याबाबतचे आदेश क्रमांक- रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.७/का-६, दिनांक ७/५/२०१६ चे आणि यासंदर्भात यापूर्वी दिलेले सर्व आदेश रद्द करून पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

| अ.क्र. | वर्ग | अधिकार प्रदान करण्यात आलेले सक्षम अधिकारी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रारुप प्रभाग रचना तयार करणे | प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे | प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे | प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे | सुनावणीअंती जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त अहवालानुसार अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे |
| १ | अ | मुख्याधिकारी | जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडे सादर करणे | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | राज्य निवडणूक आयुक्त |
| २ | ब | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | राज्य निवडणूक आयुक्त |
| ३ | क | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ४ | नगरपंचायत | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करताना त्यामध्ये लगतच्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार प्रभागांची एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या, प्रभागांच्या चतु:सीमा, आरक्षण व इतर संबंधित बाबी नमूद कराव्यात. उपरोक्त अधिकार त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांना प्रदान करू नयेत.

( यु.पी.एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रत:-

१. प्रधान सचिव(२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
५. सर्व उप विभागीय अधिकारी
६. मुख्याधिकारी, नगरपरिषदा व नगरपंचायती (सर्व)
७. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
८. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती (कार्या-६)